**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरात असलेल्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विद्यापीठ संकेतस्थळावर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता दि. १७ नोव्हेंबरपासून सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बी.एस्सी. अंतीम वर्षाचे निकाल अद्याप जाहीर व्हायचे असून, निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीद्वारे प्रवेशाकरीता अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख http://admission.sgbau.ac.in या वेबसाईटवर जाहीर केल्या जाणार आहे. तोपर्यंत विद्यार्थी ऑनलाईन अर्ज सादर करु शकतात.

विद्यापीठामध्ये एम.ए. (ट्रान्सलेशन हिंदी, इंग्रजी, मराठी, समाजशास्त्र, जेन्डर वुमेन स्टडीज, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स, कॉऊन्सेलिंग ॲन्ड सायकोथेरपी, परफॉरमिंग आर्टस, योगशास्त्र ॲन्ड फंक्शनल इंग्लिश), एम.कॉम., एम.एस्सी. (रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सांख्यिकीशास्त्र, भूगर्भशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र, उपयोजित परमाणू, जीवतंत्रशास्त्र व गृहविज्ञान), बी.एल.आय.एस्सी., एम.एल.आय.एस्सी., एलएल.एम., पी.जी.डी.सी.एस., पी.जी.डी.एच.आर.ई., पी.जी.डी.डब्ल्यु.टी.एम., पी.जी.डी. इन योगाथेरपी, पी.जी.डी. इन इंग्लिश कम्युनिकेशन स्कील्स व पी.जी.डी. इन कॉऊन्सेलिंग ॲन्ड सायकोथेरपी या अभ्याक्रमांकरीता विद्यार्थी प्रवेश घेवू शकतील. अराखीव वर्गवारीतील विद्यार्थ्यांना रुपये तीनशे, तर राखीव वर्गवारीतील विद्यार्थ्यांकरीता रुपये दोनशे प्रवेशाकरीता आवेदनपत्र सादर करतांना डी.डी. स्वरुपात किंवा विद्यापीठाच्या वित्त विभागाच्या कॅश कॉऊन्टरवर रोखीने किंवा ऑनलाईन पद्धतीने सादर करता येईल. डी.डी. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या नावाने काढावयाचा आहे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून पोस्टाद्वारे किंवा स्वतः अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश समिती, विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या ठिकाणी जमा केलेल्या रकमेच्या पावतीसह सादर करावयाची आहे. अधिक माहितीकरीता केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. वर्षा नाठार यांचेशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९४२२९६२८८७, ८६००५८९८४२ यावर संपर्क साधता येईल. तरी ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसरातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी ऑनलाईन अर्ज विहित शुल्कासह सादर करावेत, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 140